**सरकारी पोर्टलवर डेबीट कार्डव्दारे जमा होणाऱ्या महसूलासाठी एम. डी. आर. शुल्काचे (Merchant Discount Rate) शासनाचे सर्व बँकांकरिता एकसमान धोरण राबविण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१७/कोषा प्रशा-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - १८ मार्च, २०२६

**वाचा** - १. भारत सरकारची अधिसूचना दिनांक २७.१२.२०१७

२. अतिरिक्त सचिव, इलेक्टॉनिक आणि सूचना प्रौद्योगिकी मंत्रालय (MritY) यांचे परिपत्रक क्रमांक २ (५)/२०१८-DPD, दिनांक ३१.१२.२०१९

३. भारत सरकार, अधिसूचना क्र.R-180001/1/2020-GBA-CGA/918-1068, दिनांक १७.०९.२०२१

**प्रस्तावना :-**

उपरोक्त “वाचा क्र.१” येथील भारत सरकारच्या अधिसूचनेनुसार, देशात डिजिटल पेमेंट व्यवहाराला चालना देण्यासाठी, सरकारी पोर्टलवर डेबीट कार्डव्दारे जमा होणाऱ्या महसूलासाठी केंद्र सरकारची एम. डी. आर. **(Merchant Discount Rate)** योजना राबविण्यात येत होती व त्यात दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक ३१.१२.२०१९ पर्यत रुपये २,०००/- पर्यतच्या एम. डी. आर. शुल्काची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून करण्यात येत होती.

उपरोक्त “वाचा क्र.२” नुसार केंद्र सरकारची ही योजना दिनांक ३१.१२.२०१९ पासून बंद करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे.

तदनंतर राज्य शासनाच्या विविध पोर्टलवरील डेबिट कार्ड व्यवहारांसाठी वेगवेगळया पोर्टलसाठी शासनाच्या वेळोवेळी निर्गमित झालेल्या निर्णयानुसार एम.डी.आर शुल्क दर आकारणी होत असून त्यात तफावत आहे. तसेच शुल्क आकारणी काही बाबतीत शासनाकडून तर काही बाबतीत ग्राहकांकडून करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे.

“वाचा क्र.३” भारत सरकारच्या अधिसूचनेनुसार "No MDR shall be paid by the Government portal to the Authorized Acquirer Bank and their PGS/PGAs. All MDR charges would be paid by the customer/Card Holder in addition to the fee/charges for services sought for in terms of Rule 6 of Receipt and Payment Rules" असे नमुद आहे. या सर्व बाबींचा विचार करता

एम.डी. आर. (Merchant Discount Rate) शुल्काबाबत राज्य शासनाचे सर्व बँकांकरिता एकसमान धोरण निश्चीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

सरकारी पोर्टलच्या माध्यमातून डेबीट कार्डव्दारे जमा होणाऱ्या महसूलासाठी संबंधीत बँकेस / पेमेंट गेटवे यांना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून कोणतेही एम.डी.आर. शुल्क राज्य शासनाकडून अदा केले जाणार नाही. तसेच राज्य शासनाच्या कोणत्याही विभाग अथवा कार्यालयातून या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर झालेल्या एम.डी.आर शुल्काच्या खर्चास मंजूरी देण्यात येऊ नये आणि कोषागार कार्यालयातून या शासन निर्णयाच्या दिनांकानंतरच्या कालावधीतील एम. डी. आर. शुल्काची देयके पारीत करण्यात येऊ नयेत. डेबीट कार्डव्दारे जमा होणा-या महसूलासाठी अदा करायचे शुल्क यापुढे ग्राहक / कार्ड धारक यांच्याकडून आकारण्यात यावे. यापूर्वी यासंदर्भात केलेल्या करारात दुरुस्त्या करुन घेण्यात याव्यात तसेच सदर बदल संबंधीत पोर्टलवरील मुख्यपृष्ठांवर प्रदर्शित करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३१८१२२२०५०१०५ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.03.18 12:23:10 +05'30'

**( रविकुमार लिंगनवाड )**
**उप सचिव, वित्त विभाग**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृह निर्माण) यांचे सचिव / प्रधान सचिव.
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि उत्पादन शुल्क) यांचे सचिव / प्रधान सचिव.
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख, आणि कार्यालय प्रमुख.
१०. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.
१२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१५. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२.
१६. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१.
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई.
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१९. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२१. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
२२. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२४. सर्व विभागीय आयुक्त.
२५. सर्व जिल्हाधिकारी.
२६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२८. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई.
२९. सह संचालक, लेखा व कोषागारे,कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर.
३०. सह संचालक, स्थानिक निधी लेखा, कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर.
३१. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय मुंबई.
३२. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
३३. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर.
३४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३५. सर्व उप कोषागार अधिकारी.
३६. वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३७. निवड नस्ती कोषा. प्रशा.- ४ कार्यासन.